Smart गुंतवणूक

# ‘मुथूट फायनान्स’चा एनसीडी इश्यू : गुंतवणूक करावी का

सुवर्ण कर्जपुरवठा क्षेत्रातील आघाडीच्या मुथूट फायनान्स लि.ने ३०० कोटी रुपयांचा नॉन कन्व्हर्टिबल डिबेंचर (एनसीडी) इश्यू बाजारात आणला असून, त्यासोबत कंपनीने ३०० कोटी रुपयांचा ‘ग्रीन शू’ पर्यायदेखील ठेवला आहे. कंपनीने या इश्यूसाठी १३ ते १३.४३ टक्के अशा आकर्षक व्याजदराचा पर्याय दिला असल्याने जोखीम पत्करण्याची तयारी असलेल्या गुंतवणूकदारांसाठी ही एक उत्तम संधी आहे. या गुंतवणुकीमध्ये समाविष्ट जोखीम आणि परतावा आदींबाबतचे विश्लेषण पुढे देण्यात आले आहे.

मुथूट फायनान्स लि. ही सुवर्ण कर्जपुरवठा क्षेत्रात काम करणाऱ्या जुन्या मातब्बर कंपन्यांपैकी एक असून, दक्षिण भारतात तिचे उत्तम बस्तान बसलेले आहे. भांडवली पर्याप्तता प्रमाण (सीएआर) किमान १५ टक्के आवश्यक असताना प्रत्यक्षात या कंपनीचा सीएआर १८.२४ टक्के इतका उत्तम आहे. कंपनीची ढोबळ अनुत्पादक मालमत्ता ०.५९ टक्के एवढी कमी असून, कित्येक वर्षे कंपनी चांगला नफा कमावित आहे. कंपनीला ‘एए-’ मानांकन मिळाले असून, याचा अर्थ या इश्यूच्या गुंतवणूकदारांना कमी जोखीम पत्करावी लागणार असा होतो. या सर्व मुद्द्यांचा विचार करता असे दिसून येते, की कंपनीची आर्थिक स्थिती मजबूत असून, १३ टक्के निश्चित व्याजदर देणारे अन्य पर्याय सध्या बाजारात नसल्याने या इश्यूमध्ये काही प्रमाणात गुंतवणूक करण्यास हरकत नाही. नजीकच्या काळात सोन्याचे भाव लक्षणीय प्रमाणात घसरले तर कंपनीच्या अनुत्पादक मालमत्तेमध्ये मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. तशा परिस्थितीत कंपनीला आर्थिक अडचण भेडसावू शकते. त्यामुळे, गुंतवणूकदारांनी आपली सर्व गुंतवणूक या इश्यूमध्ये एकवटू नये. आपल्या नियोजित गुंतवणुकीच्या १० ते २५ टक्के रक्कमच यामध्ये गुंतविणे इष्ट ठरेल.

**– राहुल मंत्री**

(लेखक सर्टिफाइड फायनान्शियल प्लॅनर - सीएफपी आहेत.)

### मुथूट फायनान्स एनसीडीची ठळक वैशि

| | |
|---|---|
| इश्यू साईज | रुपये ६०० कोटी |
| इश्यू सुरू होण्याची तारीख | २२ डिसेंबर २० |
| इश्यू संपण्याची तारीख | ७ जानेवारी २० |
| पत मानांकन | एए- |
| मुदत कालावधी | २ वर्षे ते ५.५ व |
| व्याजदर | १३ टक्के ते १३ |
| किमान गुंतवणूक | रुपये ५००० |
| रिटेल गुंतवणूकदारांसाठी कोटा | ४० टक्के राकीव |
| अॅलॉटमेंट | फक्त डी-मॅट स्व |
| नोंदणी | एनएसई आणि बी |
| ॲप्लिकेशन मनीवरील व्याजदर | ८ टक्के वार्षिक |